# घटक १२= राष्ट्रपती

राज्यघटनेचा - भाग ५
कलम ५२ ते ७८ } संघराज्याचा कार्यकारी विभाग.

कार्यकारी विभागात ⟶ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्रिमंडळ, भारताचा महान्यायवादी

राष्ट्रपती ⟶ राष्ट्राचा प्रमुख — प्रथम नागरिक.

## निवडणूक *

अप्रत्यक्ष ⟹ निर्वाचक मंडळाकडून- त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश.

① संसदेच्या दोन्ही सभागृहातील निवडून आलेले सदस्य
② राज्य विधानसभातील —"—
③ दिल्ली व पुदुच्चेरी विधानसभा —"—
(१९९५ पासून - ७० वी घ.दु.)

### सहभागी नसलेले घटक

① संसदेच्या दोन्ही सभागृहातील
② राज्य विधानसभांतील
③ विधानपरिषद असलेल्या राज्य विधानपरिषदांतील
④ दिल्ली व पुदुच्चेरी विधानसभांतील
} नामनिर्देशित सदस्य.

निवडणुकीमध्ये राज्याचा आणि संसदेचा सदस्य किती मते देऊ शकतो हे खालील पद्धतीने ठरविले जाते.

→ राज्याच्या विधानसभेतील निवडून आलेल्या सदस्याला राज्याच्या लोकसंख्येला विधानसभेतील निवडून आलेल्या सदस्य संख्येने भागून आलेली संख्या हजाराच्या जितक्या पटीत असेल तितकी मते देता येतात.

$$\text{विधानसभा सदस्याच्या मताचे मूल्य} = \frac{\text{राज्याची लोकसंख्या}}{\text{विधानसभा निवडून आलेले सदस्य}} \times \frac{1}{1000}$$

$$\text{संसद सदस्याच्या मताचे मूल्य} = \frac{\text{राज्यातील विधानसभा सदस्यांच्या मताचे मूल्य}}{\text{संसदेच्या दोन्ही गृहातील निवडून आलेल्या सदस्य संख्या}}$$

निवडणूक ⟹ प्रमाणशीर प्रतिनिधित्व एकल संक्रमणीय मतदान पद्धत = गुप्त मतदान प.

* प्रत्येक सदस्याला एक मतदान पत्रिका — त्यावर १,२,३,४ प्राधान्यक्रम.
* पहिल्या टप्प्यात पहिल्या प्राधान्यक्रमाची मते - मोजली जातात.

प्रमाण मतसंख्या मिळाली तर उमेदवार निवडून येतो.

$$\text{प्रमाण मतसंख्या} = \frac{\text{एकूण वैध मते}}{\text{निवडून द्यायच्या प्रतिनिधी संख्या} = 1 + 1} + 1$$

* नसल्यास सर्वात कमी प्रथम क्रमांकाची मते मिळालेली मतपत्रिका रद्द.

Scanned by CamScanner

५१ आणि त्यानंतर दुसऱ्या प्राधान्यक्रमाची मते प्रथम प्राधान्यक्रमाच्या इतर उमेदवारांना दिली जातात.

⇒ राष्ट्रपतीच्या निवडणूकी संबंधी सर्व शंका व विवाद — चौकशी सर्वोच्च न्यायालयात. निर्णय अंतिम.

* निर्वाचन मंडळात जागा रिक्त होण्या या कारणावरून राष्ट्रपतीच्या निवडणूकीला आव्हान देता येत नाही.

## १९५२ ते २०१७ — राष्ट्रपती निवडणुका.

| अ.क्र. | वर्ष | विजयी | मते/टक्के | मुख्य प्रतिस्पर्धी | मते/टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९५२ | राजेंद्रप्रसाद | ८३% | के.टी.शाह | १५.३% |
| २ | १९५७ | राजेंद्र प्रसाद | ९९% | एन.एन.दास | ०.४% |
| ३ | १९६२ | राधाकृष्णन | ९८% | चौधरी हरीराम | १.१% |
| ४ | १९६७ | झाकीर हुसेन | ५६% | के सुब्बाराव | ४३% |
| ५ | १९६९ | व्ही.व्ही.गीरी | ५०% | एन.संजीव रेड्डी | ४८% |
| ६ | १९७४ | फकरुद्दीन अली | ८०% | त्रिदिब चौधरी | १९% |
| ७ | १९७७ | एन संजीव रेड्डी | (बिनविरोध) | | |
| ८ | १९८२ | ग्यानी झैल सिंग | ७२% | एच आर खन्ना | २७.६% |
| ९ | १९८७ | आर व्यंकटरमन | ७२% | व्ही कृष्णा अय्यर | २७.१% |
| १० | १९९२ | शंकर दयाल शर्मा | ६५% | जॉर्ज स्वेल | ३३% |
| ११ | १९९७ | के आर नारायणन | ९४% | टी.एन शेषण | ५% |
| १२ | २००२ | अब्दुल कलाम | ८९% | लक्ष्मी सहगल | १०.३२% |
| १३ | २००७ | प्रतिभाताई पाटील | ६५% | बी.एस. शेखावत | ३४% |
| १४ | २०१२ | प्रणव मुखर्जी | ६९% | पी.ए.संगमा | ३०% |
| १५ | २०१७ | रामनाथ कोविंद | ६५% | मीरा कुमार | ३४.३% |

Scanned by CamScanner

## ...ता/शपथ/अटी

पात्रता.
1. भारताचा नागरिक
2. वय 35 पूर्ण असले पाहिजे.
3. लोकसभा सभासद म्हणून निवडून येण्यास पात्र.
4. केंद्रिय किंवा राज्यातील कोणत्याही प्राधिकरणामध्ये लाभाच्या पदावर असता कामा नये.
(राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यपाल, केंद्रातील किंवा राज्यातील मंत्रिपदे लाभाची पदे मानली जात नाही.)

⇒ नामांकन भरणाराचे नाव कमीत कमी 50 मतदारांनी प्रस्तावित केले पाहिजे.
व किमान 50 मतदारांचे अनुमोदन पाहिजे.

⇒ अनामत रक्कम 15000 – (1/6 पेक्षा कमी मते मिळाल्यास अनामत जप्त)
(1997 पूर्वी सूचक व अनुमोदक प्रत्येकी 10 व अनामत रक्कम 2500 रु.
राष्ट्रपती / उपराष्ट्रपती निवडणूक कायदा 1952 मध्ये 1997 साली दुरुस्ती)

शपथ ⇒ सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश शपथ देतो.
अनुपस्थित असल्यास ज्येष्ठ न्यायाधीश.
प्रभारी राष्ट्रपती / राष्ट्रपतीची कामे करणाऱ्या इतर व्यक्तीने सुद्धा शपथ घ्यावयाची असते.

अटी :
1. दोन्ही गृहाच्या किंवा राज्य विधिमंडळाचा सदस्य असता कामा नये.
जर अशी व्यक्ती राष्ट्रपतीपदी निवडून आली तर ज्या दिवशी तो राष्ट्रपतीपद ग्रहण करेल त्या दिवसापासून त्याने गृहातील पद सोडले आहे.
2. लाभाचे पद असता कामा नये.
3. विनाभाडे अधिकृत निवासस्थान वापरण्याचा अधिकार
4. संसद ठरवेल त्यानुसार वेतन भत्ते लाभ घेण्याचा अधिकार.
5. त्याच्या कार्यकाळात वेतन व भत्ते कमी करता येत नाही.

वेतन ⇒ 2008 मध्ये ⟶ 50 हजार / महिना —वाढ→ 1.5 लाख / महिना.
1 फेब्रु 2018 ⇒ 1.5 लाख / म. ⟶ 5 लाख / महिना.
पेन्शन – 1.5 लाख.
पत्नी – 30 हजार / महिना

कार्यकाल –
पदग्रहण केल्यापासून 5 वर्षे.
तत्पूर्वी कधीही राजीनामा देवू शकतो ⟶ (उपराष्ट्रपतीकडे.)
तसेच महाभियोग चालवून पदच्युत करता येते.
पुनर्निवडणूकीसाठी पात्र – कितीही वेळा निवडून जावू शकतो (अमेरिका - दोनवेळा फक्त)

क्र

## महाभियोग

⇒ राज्यघटनेचा भंग केल्याबद्दल : –मात्र भंग याची व्याख्या घटनेत नाही.

⇒ आरोपपत्र ⟶ कोणत्याही गृहात मांडता येते.

⇒ ज्या गृहात मांडले जाईल त्या गृहाच्या सदस्य संख्येच्या 1/4 सदस्यांची आरोपपत्रावर स्वाक्ष

⇒ संदर्भात राष्ट्रपतीला 14 दिवसांची पूर्वसूचना.

⇒ ठराव त्या गृहात 2/3 बहुमताने संमत झाल्यावर दुसऱ्या गृहाकडे.

⇒ सखोल चौकशी होवू शकते. राष्ट्रपतींना आपली बाजू मांडण्याचा अधिकार.

⇒ दुसऱ्या गृहात 2/3 बहुमताने संमत झाल्यास त्यास पदच्युत व्हावे लागते.

या संदर्भात महत्त्वाच्या बाबी.

① नामनिर्देशित सदस्य महाभियोगात सहभागी होतात.

② राज्यांच्या किंवा दिल्ली व पुदुच्चेरीच्या विधान सभेचे सदस्य सहभागी होत नाही.

आतापर्यंत कोणत्याही राष्ट्रपती विरुद्ध महाभियोग यशस्वी झाला नाही.

## राष्ट्रपतीपद रिक्त असणे :

खालील परिस्थितीत राष्ट्रपतीपद रिक्त होवू शकते.

① 5 वर्षे कार्यकाल संपल्यावर

② राजीनामा दिल्यावर

③ महाभियोगाने पदच्युत झाल्यावर

④ मृत्यू झाल्यामुळे. (झाकीर हुसेन व फकरुद्दीन अली)

* कार्यकाल संपण्यापूर्वी निवडणूक घ्यावी.
* कार्यकाल संपल्यानंतर निवडणूक झाल्यास कार्यकाल संपलेले राष्ट्रपती जादा काळ पदावर राहतो.
  (अशा परिस्थितीत उपराष्ट्रपती कारभार पाहत नाही.)
* अन्य कारणामुळे पद रिक्त झाल्यास सहा महिन्यांच्या कालावधीत निवडणूक घेतली पाहिजे.
  (अशा परिस्थितीत उपराष्ट्रपती कारभार पाहतो. –प्रभारी राष्ट्रपती म्हणून. तेपद रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश व तेही पद रिक्त असेल तर सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश)

  ज्यावेळी वरीलपैकी कोणीही प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम पाहतो त्यावेळी त्यास राष्ट्रपतीचे सर्व अधिकार, संरक्षण, वेतन, भत्ते, सोयी, सवलती मिळतात.

## राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्ये.

① कार्यकारी अधिकार
② कायदेविषयक –॥–
③ आर्थिक –॥–
④ न्यायिक –॥–
⑤ परराष्ट्रसंबंध विषयक –॥–
⑥ सैन्यविषयक –॥–
⑦ आणिबाणीविषयक –॥–

Scanned by CamScanner

कारी अधिकार

① सर्व कार्यकारी कामकाज राष्ट्रपतीच्या नावे.
② पंतप्रधानाची आणि इतर मंत्र्यांची नियुक्ती. (राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पदावर)
③ महान्यायवादी नियुक्ती - वेतन ठरविणे ( ——— ‖ ——— )
④ महालेखापरिक्षक, मुख्य निवडणूक आयुक्त, इतर निवडणूक आयुक्त, केंद्रिय लोकसेवा आयोग अध्यक्ष आणि सदस्य, राज्यपाल, वित्त आयोगाचे अध्यक्ष व सदस्य इ.ची नियुक्ती.
⑤ कामकाजाविषयी पंतप्रधानाकडून माहिती मागवू शकतो.
⑥ SC/ST/OBC यांच्या परिस्थितीचे अध्ययन करण्यासाठी आयोग नियुक्त करू शकतो
⑦ आंतरराज्यीय परिषद स्थापन करू शकतो.
⑧ नियुक्त केलेल्या प्रशासकाद्वारा केंद्रशासित प्रदेशाचे थेट प्रशासन करतो.
⑨ कोणतेही क्षेत्र अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित करू शकतो.

② कायदेविषयक अधिकार

① दोन्ही गृहांची अधिवेशने बोलावू शकतो / बरखास्त करू शकतो. लोकसभा विसर्जित करू शकतो., दोन्ही गृहाची संयुक्त बैठक बोलावू शकतो.
② संसदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला आणि दरवर्षी पहिल्या अधिवेशनाला संबोधित करू शकतो.
③ प्रलंबित विधेयकासंबंधी संसदेला निरोप पाठवणे.
④ सभापती व उपसभापती दोन्ही पदे रिक्त झाल्यावर लोकसभेच्या कोणत्याही सदस्याला अध्यक्षपदी नियुक्त करू शकतो. (लोकसभेत व राज्यसभेत दोन्हीकडे)
⑤ साहित्य, विज्ञान, कला आणि स. सेवा यांतील विशेष ज्ञान असलेल्यांपैकी १२ सदस्य नामनिर्देशित करतो → राज्यसभेत
लोकसभेत २ अँग्लो इंडियन सदस्य नामनिर्देशित करू शकतो.
⑥ निवडणूक आयोगाशी विचारविनिमय करून संसद सदस्यांच्या अपात्रतेचे निर्णय घेतो.
⑦ काही विधेयके संसदेत मांडण्यापूर्वी त्याची पूर्वपरवानगी आवश्यक.
उदा → अ) संचित निधीतून करावयाच्या खर्चासंबंधी
ब) राज्याच्या सीमांत / नावात बदल
क) धन विधेयके.
⑧ संसदेने विधेयके संमत करून राष्ट्रपतीकडे पाठवल्यास,
① संमत करू शकतो.
② संमती राखून ठेवू शकतो.

Scanned by CamScanner

③ विधेयक संसदेच्या पुनर्विचारार्थ पाठवू शकतो. (अर्थ विधेयक सो.) संसदेने असे विधेयक पुन्हा संमत केल्यास राष्ट्रपतीला त्याला मान्यता द्यावीच लागते.

④ जेव्हा राज्य विधिमंडळातील विधेयक राज्यपालाने राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवले असेल तेव्हा.

① संमत करू शकतो.

② संमती राखून ठेवू शकतो

③ पुनर्विचारार्थ परत पाठवू शकतो (अर्थ विधेयक नसेल तर)

राज्य विधी मंडळाने जरी संमत करून परत पाठवले तरी त्यावर सही करणे बंधनकारक ना.

⑩ अध्यादेश जारी करू शकतो.

⑪ तो महालेखापाल, केंद्रिय लोकसेवा आयोग, वित्त आयोग हे अहवाल संसदेपुढे मांडतो.

⑫ अंदमान / निकोबार / लक्षद्वीप / दादरा नगर हवेली / दमण व दीव / यांच्या सुशासनासाठी नियम करू शकतो. - (विधानसभा असेल तर पुदुच्चेरी साठी पण)

③ न्यायिक अधिकार

- ① सर्वोच्च न्याया व उच्च न्याया न्यायाधिश नियुक्ती

② कायदा किंवा नासम बाबींवर सर्वोच्च न्याया सल्ला मागु शकतो.

③ व्यक्तीला कोणत्याही गुन्ह्याबद्दल झालेल्या शिक्षेत माफी सूट किंवा जवळत देऊ शकतो. शिक्षा कमी करू शकतो किंवा रद्दही करू शकतो किंवा एका प्रकारची शिक्षा दुसऱ्या प्रकारात परावर्तीत करू शकतो.

① लष्करी न्याया. नं दिलेल्या शिक्षा.

② केंद्रिय कायद्याच्या उल्लंघनासंदर्भात शिक्षा.

③ देहदंडाची शिक्षा.

④ परराष्ट्रसंबंधविषयक अधिकार

① आंतरराष्ट्रीय करार व ठराव यांच्याविषयी वाटाघाटी - राष्ट्रपतींमार्फत (संसदेची मान्यता असेल तर)

② परराष्ट्रात राजदूत, उच्चायुक्त इ.ची नियुक्ती

⑤ लष्करी अधिकार

① संरक्षण दलाचा सर्वोच्च सेनापती

② भूदल/नाविक/हवाई दलाच्या प्रमुखांची नियुक्ती

③ संसदेच्या मान्यतेने युद्ध घोषित करणे, समाप्त करणे.

Scanned by CamScanner

अध्याय ४) आणिबाणी विषयक अधिकार

① राष्ट्रीय ② घटनात्मक / राष्ट्रपती राजवट / आर्थिक आणिबाणी घोषीत करू शकतो.

आर्थिक अधिकार

① अर्थविधेयक त्याच्या पूर्वपरवानगीनेच संसदेत सादर केले जाते.
② केंद्रिय अर्थसंकल्प सादर करावे असा आदेश देवू शकतो.
③ त्याच्या शिफारशी शिवाय अनुदानाची मागणी करता येत नाही.
④ आकस्मिक निधीतून आगाऊ निधी देवू शकतो.
⑤ वित्त आयोगाची स्थापना.

राष्ट्रपतीचा नकाराधिकार

नकाराधिकार म्हणजे विधेयकाला मान्यता देणे रोखणे.

उद्देश ⟶ ① संसदेने घाईघाईने / विचार न करता कायदा करू नये.
② संसदेने घटनाबाह्य कायदा करू नये.

चार प्रकार

① पुर्ण नकाराधिकार :

विधेयकाची मान्यता राखून ठेवणे - विधेयकाचा अंत होतो;
खालील बाबीमध्ये
① खाजगी सदस्यांनी मांडलेली विधेयके
② शासनाने मांडलेली (संमत झालेली पण राष्ट्रपतींनी सही होण्यापुर्वी मंत्रिमंडळाने राजीनामा दिला व नवीन मंत्रिमंडळाने सल्ला दिला)

② निलंबनाचा नकाराधिकार

पूनर्विचारार्थ परत पाठविणे म्हणजेच निलंबन वापरणे.
परंतु परत मंजूर होवुन आलेले विधेयक संमत करावेच लागते.
(अर्थ विधेयक सोडून → याबाबतीत मान्यता राखून ठेवू शकतो परत पाठवु शकत नाही)

③ प्रलंबनाचा ~~नकाराधि~~ नकाराधिकार :

मान्यता देत नाही व नकारही देत नाही पण अनिश्चीत काळापर्यंत विधेयक प्रलंबित ठेवतो - सकारात्मक / नकारात्मक कोणतीही कृती नाही.
अमेरीकेत मात्र १० दिवसाच्या आत अध्यक्षास कार्यवाही करावी लागते.
१९८६ – डाक कार्यालय दुरुस्ती विधेयक – ज्यानी झैल सिंग – याचा वापर.
घटनादुरुस्ती विधेयका बाबत राष्ट्रपतीला नकाराधिकार नाही. – २४वी घदु- १९७१

## राज्य कायद्याबाबत नकाराधिकार:

राज्यात राज्यपालाची मान्यता मिळाल्यावर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. परंतु राज्यपालाने ते राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवले असेल तर राष्ट्रपतीची मान्यता मिळाल्या शिवाय कायद्यात रूपांतर होत नाही.

राज्यपाल → (1) मान्यता देणे
(2) मान्यता देणे राखून ठेवणे.
(3) पुनर्विचारार्थ राज्य विधिमंडळाकडे पाठवणे. (अर्थ विधेयक सोडून)
(4) राष्ट्रपतीच्या विचारार्थ राखून ठेवणे. (कलम २०१)

राष्ट्रपती → (1) मान्यता देणे
(2) राखून ठेवणे
(3) पुनर्विचारार्थ राज्य विधिमंडळाकडे पाठवण्याचा राज्यपालाला आदेश देणे. परंतु पुन्हा मंजूर होऊन आलेल्या विधेयकावर सही करणे बंधनकारक नाही.

तसेच राष्ट्रपतीच्या विचारार्थ पाठवलेल्या विधेयकावर किती कालावधीत निर्णय घ्यावा हे घटनेत सांगितले नाही.

## अध्यादेश काढण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार

कलम १२३ → अधिवेशन चालू नसताना, सामर्थ्य - कायद्याचे पण हंगामी. } अकस्मिक व निकडीच्या बाबी हाताळण्यासाठी

→ एका गृहाचे अधिवेशन सुरू असताना काढू शकतो.
→ राष्ट्रपतीचा हा अधिकार न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या कक्षेत.
कूपर खटला (१९७०) न्यायालयीन कक्षेत.
३८ वी घ.दु. (१९७५) न्यायालयीन कक्षेबाहेर
४४ वी घ.दु. (१९७८) न्यायालयीन कक्षेत.
→ ज्या विषयावर संसद कायदा करू शकते त्याच विषयावर अध्यादेश काढता येतात.
→ अध्यादेशाद्वारे मूलभूत अधिकार काढून घेता येत नाही किंवा रद्द करता येत नाही.
→ अधिवेशन सुरू झाल्यावर दोन्ही गृहात सादर करणे → मान्यता → कायद्यात रूपांतर
— त्यावर काही कृती झाली नाही तर अधिवेशन सुरू झाल्यावर सहा आठवड्यानंतर अध्यादेश लागू होत नाही.
→ असंमत केला तर त्याअगोदरच रद्द.
→ अधिवेशन वेगवेगळ्या तारखांना सुरू झाले तर उशिरा सुरू होणाऱ्या अधिवेशन तारखेपासून ६ आठवडे.
→ अध्यादेश मागे घेऊ शकतो.
→ हा विवेकाधिकार नसून → पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार

Scanned by CamScanner

तो अध्यादेश कायदा किंवा मागे घेतो.

→ अध्यादेश पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येतो.

→ संसदेच्या कायद्याने किंवा दुसऱ्या अध्यादेशाने बदल करता येतात / रद्द करता येतात.

## क्षमा करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार

कलम ७२

क्षमा करण्याचा अधिकार न्यायव्यवस्थेपासून स्वतंत्र.
राष्ट्रपती अपिलाचे न्यायालय म्हणून काम करीत नाही.

### क्षमा करण्याचे प्रकार

① क्षमा ⟹ गुन्हा निर्दोष होणे व शिक्षा दोन्ही रद्द होतात. अपराध्याला पूर्ण माफी.

② पर्यायी शिक्षा ⟹ कडक शिक्षेपेक्षा सौम्य शिक्षा. (स्वरूप बदल)

③ लघुकरण ⟹ शिक्षेचे स्वरूप न बदलता शिक्षा कमी करणे.

④ सूट ⟶ सुरुवातीला दिलेल्या शिक्षेपेक्षा कमी शिक्षा

⑤ स्थगिती ⟹ तात्पुरत्या काळासाठी स्थगिती - क्षमा किंवा शिक्षा याकरिता विनंती करण्यास वेळ मिळावा हा उद्देश

* राष्ट्रपती लष्करी न्यायालयाने दिलेल्या शिक्षेबाबत क्षमा करू शकतो / राज्यपाल नाही.

* राष्ट्रपती देहदंडाची शिक्षा माफ करू शकतो / राज्यपाल नाही.
(राज्यपाल या शिक्षेला स्थगिती, लघुकरण किंवा पर्यायी शिक्षा देऊ शकतो)

### याबद्दलची तत्वे

① दयेची विनंती तोंडी करण्याचा अधिकार नाही.
② पुराव्यांचे नव्याने परिक्षण
③ अधिकाराचा वापर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार
④ त्याने दिलेल्या आदेशाची कारणे देणे बंधनकारक नाही
⑤ पूर्वी दयेचा अर्ज फेटाळला असेल तर परत अर्ज करून स्थगिती नाही.
⑥ मनमानी, अतार्किक, पक्षपाती, वाईट हेतू ही कारणे सोडून पुनर्विलोकन नाही.

## राष्ट्रपतीचे घटनात्मक स्थान

→ नाममात्र कार्यकारी प्रमुख.

→ स्थान ब्रिटिश राज्यघटनेतील राजाप्रमाणे - देशाचे प्रतिनिधीत्व करतो पण राज्यकारभार करीत नाही. मंत्रिमंडळाचा सल्ला त्याच्यावर बंधनकारक.

→ ४२ वी घ.दु. - १९७६ ⇒ मंत्रिमंडळाचा सल्ला राष्ट्रपतीला बंधनकारक
स्वविवेक परिस्थितीत तो मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता कृती करू शकतो —

Scanned by CamScanner

62

१) लोकसभेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत नसेल किंवा पंतप्रधानांचा अकास्मिक मृत्यू झाला असेल आणि त्याच्या जागी सुस्पष्ट अधिकारी नसेल त्यावेळी पंतप्रधानांची नियुक्ती.

२) लोकसभेत विश्वास सिद्ध करू न शकलेले मंत्रिमंडळ पदच्यूत करणे

३) मंत्रिमंडळाने बहुमत गमावल्यावर लोकसभा विसर्जित करणे.

⇒ दुसऱ्या क... निवडणूक -

**कलमे:**

५२ – भारताचा राष्ट्रपती
५३ – संघराज्याचे कार्यकारी अधिकार
५४ – राष्ट्रपती निवडणूक
५५ – निवडणूक पद्धत
५६ – कार्यकाळ
५७ – पुनर्निवडीसाठी पात्र
५८ – पात्रता
५९ – राष्ट्रपती पदाच्या अटी
६० – शपथ
६१ – महाभियोग
६२ – पद रिक्त झाल्यावर निवडणूक घेण्यासाठी कालावधी
६३ – उपराष्ट्रपती
६४ – राज्यसभेचा सभापती
६५ – प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम
६६ – निवडणूक
६७ – कार्यकाळ
६८ – निवडणूक घेण्याची मुदत
६९ – शपथ
७० – अकास्मिक प्रसंगी राष्ट्रपतीची कामे पार पाडणे
७१ – राष्ट्रपती/उपराष्ट्रपती निवडणुकीसंबंधी निगडीत बाबी
७२ – राष्ट्रपतीच्या क्षमा करण्याचा अधिकार
७३ – संघराज्य कार्यकारी अधिकारांची व्याप्ती

७४ – राष्ट्रपतीला सल्ला/सहाय्य – मंत्रिमंडळ
७५ – मंत्र्यांसंबंधी तरतुदी
७६ – भारताचा महान्यायवादी
७७ – सरकारचे कामकाज चालवणे
७८ – राष्ट्रपतीला माहिती देणे – पंतप्रधान कर्तव्य
८५ – संसद अधिवेशने तहकूबी विसर्जन
१११ – संसदेने संमत केलेल्या विधेयकांना मान्यता
११२ – केंद्रीय अर्थसंकल्प
१२३ – अध्यादेश – अधिकार
१४३ – राष्ट्रपती – सर्वोच्च न्याया. विचारविनिमय